अर्धसाप्ताहिक

# ब्रम्हपुरी समाचार

संपादक अशोक भैया

RNI No. MAHMUL/2016/69789

E-Mail ID : bramhapurisamachar@gmail.com

Postal Regd. No. G2/47/CHD-283/2023-25

गुरूवार, दि. 18 डिसेंबर 2025 | वर्ष 11 वे | अंक 18 वा | ब्रम्हपुरी | पाने 6 | किंमत 2 रूपये

# सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी शेतकऱ्याने विकली किडनी

### मिंथूर ता. नागभीड येथील तरूण शेतकरी रोशन कुडे यांची व्यथा

## सहा जणांविरोधात अवैध सावकारीचा गुन्हा दाखल





नागभीड/प्रतिनिधी

नागभीड तालुक्यात माणुसकीला काळिमा फासणारी धक्कादायक घटना पुढे आली आहे. कर्जाचा परतावा करण्यासाठी सावकाराने शेतकऱ्याला किडनी विकायला लावली. या क्रूर प्रकाराने महाराष्ट्र हादरला आहे. जिल्हातील नागभीड तालुक्यात येणाऱ्या मिंथुर गावात हा प्रकार घडला. बळीराजाच्या वेदना पाहून दगडालाही पाझर फुटेल. मात्र सरकार, प्रशासनाला बळीराजाचं आभाळाएवढं दु:ख कधी दिसलंच नाही.

### मानवी अवयवांची तस्करी करणारे आंतरराष्ट्रीय रॅकेट तर सक्रीय नाही ना!

**सदर प्रकरणात मानवी अवयव तस्करीचे रॅकेट सक्रीय असण्याची शक्यता नाकारता येत नाही. पिडीत शेतकऱ्याने एजंटच्या माध्यमातून कोलकाता गाठणे व तेथून किडनी विकण्यासाठी कंबोडिया या देशात जाऊन ती विकणे, हा घटनाक्रम भारतामध्ये सक्रीय असल्याचा अप्रत्यक्ष पुरावा देतो. या बाजूनेदेखील तपास करणे आवश्यक आहे.**

चंद्रपूर जिल्हातील या कर्जबाजारी शेतकऱ्याची वेदना आभाळाला भिडणारी आहे. सावकारी कर्जाच्या जाळयात अडकलेल्या या शेतकऱ्याला कर्ज फेडण्यासाठी स्वत:ची किडनी विकण्याचा वेदनादायी प्रसंग ओढवला आहे. या शेतकऱ्याचं नाव आहे रोशन सदाशिव कुडे. ते चंद्रपूर जिल्हातील नागभीड तालुक्यातील मिंथुर गावातील रहिवाशी आहेत. निसर्गाला जिंकणारा बळीराजा सावकारीला मात्र पुरता हरला आहे. रोशन कुडे यांच्याकडे चार एकर शेती आहे. या शेतीवरच त्यांचा कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. निसर्गाचा लहरीपणामुळे शेती फायदेशीर ठरली नाही. त्यामुळे शेतीपूरक व्यवसाय करण्याचं त्याने ठरवलं. दुग्ध व्यवसायातून थोडी मिळकत होईल म्हणून त्याने गाई खरेदी केल्या. यासाठी त्याने दोन सावकाराकडून ५०-५० हजार रुपये घेतले. येथेही त्याला नशिबाने धोका दिला. खरेदी केलेल्या गाई मरण पावल्यात. त्यात शेतीही पिकेना. कर्जाचा डोंगर वाढत गेला.

सावकार घरी येऊन नको ते बोलू लागले. कर्जातून मुक्त होण्यासाठी त्यांनी दोन एकर जागा विकली. ट्रॅक्टर आणि घरातील सामान विकलं. मात्र कर्ज काही संपेना. एक लाखाचे कर्ज ७४ लाखावर गेलं. सावकाराकडून भरमसाठ व्याजासह वसुली केली जात आहे. एका लाखावर दिवसाला १० हजार प्रमाणे व्याज

(उर्वरित पान क्र. ६ वर)

### हे आहेत आरोपी

किशोर रामभाऊ बावणकुळे
लक्ष्मण पुंडलिक उरकुडे
प्रदीप रामभाऊ बावणकुळे
संजय विठोबा बल्लारपूरे
मनिष पुरूषोत्तम घाटबांधे
सत्यवान रामरतन बोरकर

# नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदांकरीता २१ तारखेला मतमोजणी

## ब्रम्हपुरी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५

ब्रम्हपुरी/का.प्र.

नगर परिषद ब्रम्हपुरी सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करिता दिनांक ०२/१२/२०२५ रोजी एकूण ३६ मतदान केंद्रांवर १ नगराध्यक्ष व २३ नगरसेवक पदांसाठी मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीतपणे पार पडलेली आहे. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, सदर निवडणुकीची मतमोजणी दिनांक २१/१२/२०२५ रोजी




सकाळी १०.०० वाजतापासून नगर परिषद ब्रम्हपुरी कार्यालयात सुरू होणार आहे.

मतमोजणीसाठी एकूण ०६ मतमोजणी टेबल्स ठेवण्यात आलेली आहेत. पहिल्या टप्प्यात प्रभाग क्रमांक ०१ ते ०६ यांची मतमोजणी करण्यात येणार आहे. दुसऱ्या टप्प्यात प्रभाग क्रमांक ०७ ते ११ यांची मतमोजणी करण्यात येणार आहे. प्रभाग क्रमांक ७ व ११ वगळता सर्व प्रभागांसाठी प्रत्येकी ०३ फेऱ्यांमध्ये मतमोजणी करण्यात येणार असून, प्रभाग क्रमांक ७ व ११ करिता अनुक्रमे ०४ व ०५ फेऱ्यांमध्ये मतमोजणी पूर्ण करण्यात येणार आहे. उमेदवारांनी नियुक्त केलेल्या प्रत्येकी एका मतमोजणी प्रतिनिधीस, संबंधित प्रभागाची मतमोजणी सुरू होण्यापूर्वी मतमोजणी कक्षामध्ये प्रवेश देण्यात येईल.

राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, उमेदवारांना त्यांचे मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणीस प्रारंभ होण्यापूर्वी ०३ दिवस अगोदर सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत नियुक्त करण्याची मुभा आहे. त्या अनुषंगाने मतमोजणी प्रतिनिधीची नियुक्ती करण्याकरिता अरविंद सोनकुसरे, लिपिक, निवडणूक विभाग, नगर परिषद कार्यालय, ब्रम्हपुरी यांच्याकडे नमुना ९(२) मध्ये उमेदवाराने स्वाक्षरी केलेला अर्ज, प्रतिनिधीचे दोन पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे व आधार कार्डची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.

नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक - २०२५ करिता मतमोजणीची संपूर्ण तयारी पूर्ण झालेली आहे. मतमोजणीच्या

(उर्वरित पान क्र. ६ वर)



## संपादकीय...

# शालेय वयातच व्यसनांची चाहूल!

शाळेत जाणाऱ्या मुलांमध्ये तंबाखू, धूम्रपान, मद्यपान तसेच अंमली पदार्थांचे व्यसन सरासरी अवघ्या १३व्या वर्षीच सुरू होत असल्याचे धक्कादायक वास्तव एका नव्या अभ्यासातून समोर आले आहे. एम्स दिल्लीच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या या अभ्यासाने समाज, पालक, शिक्षणव्यवस्था आणि प्रशासन या सर्वांनाच अंतर्मुख करणारा इशारा दिला आहे. दहा प्रमुख शहरांतील ५,९२० शाळकरी विद्यार्थ्यांवर करण्यात आलेल्या या अभ्यासातून व्यसनांची सुरुवात इतक्या लहान वयात होत असल्याचे स्पष्ट झाले, ही बाब अत्यंत चिंताजनक आहे.

इयत्ता ८ वी, ९ वी, ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी मोठ्या प्रमाणावर मुलांनी व्यसनांचा अनुभव घेतल्याचे या अभ्यासात आढळले. पदार्थांच्या वापराची सरासरी सुरुवातीची वयोमर्यादा १२.९ वर्षे असल्याची नोंद म्हणजे देशाच्या भविष्यासाठी धोक्याची घंटा आहे. विशेष म्हणजे इंहेलंट्ससारख्या श्वसनाद्वारे घेतल्या जाणाऱ्या पदार्थांचा वापर सर्वात लवकर, म्हणजे सरासरी ११.३ वर्षांपासून सुरू होत असल्याचे समोर आले आहे. हेरॉइन आणि वैद्यकीय औषधांचा गैरवापरही लहान वयातच सुरू होत असल्याचे वास्तव अधिकच गंभीर आहे.

या अभ्यासातील आणखी एक धक्कादायक बाब म्हणजे तंबाखू आणि मद्यपान हे सर्वाधिक वापरले जाणारे पदार्थ आहेत. १५ टक्क्यांहून अधिक विद्यार्थ्यांनी आयुष्यात कधी ना कधी व्यसनांचा वापर केल्याचे मान्य केले असून, मागील एका वर्षात १०.३ टक्के आणि मागील महिन्यात ७.२ टक्के विद्यार्थ्यांनी अशा पदार्थांचा वापर केल्याचे कबूल केले आहे. ही आकडेवारी केवळ टक्केवारी नाही, तर ती हजारो कोवळ्या आयुष्यांची कहाणी सांगणारी आहे. याहूनही अधिक चिंतेची बाब म्हणजे जवळपास निम्म्या विद्यार्थ्यांना तंबाखू सहज उपलब्ध असल्याचे तर ३६ टक्के विद्यार्थ्यांना मद्य सहज मिळत असल्याचे वाटते. यामुळे अल्पवयीन मुलांपर्यंत व्यसनाधीन पदार्थ किती सहज पोहोचत आहेत, यावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहते. शासनाने शाळांच्या शंभर मीटर परिसरात तंबाखू विक्रीवर बंदी घातली असली, तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी अत्यंत ढिसाळ असल्याचे वास्तव या अभ्यासातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

पोलिसांकडूनही ठोस कारवाई होत नसल्याची तक्रार सातत्याने ऐकू येते. विशेष म्हणजे ९५ टक्के विद्यार्थ्यांना व्यसन हानिकारक असल्याची जाणीव असूनही ते व्यसनांकडे वळत आहेत, ही बाब केवळ अज्ञानाची नव्हे तर व्यवस्थेच्या अपयशाची आहे. मित्रांचा दबाव, कुतूहल, सहज गंमत आणि नंतर सवय अशा टप्प्यांतून व्यसनाधीनतेचा प्रवास शालेय जीवनातच सुरू होत असल्याचे तज्ज्ञ सांगतात.

मुलींच्या तुलनेत मुलांमध्ये व्यसनांचे प्रमाण अधिक असले, तरी शहरी भागात मुलींमध्ये धूम्रपान व मद्यपानाचे वाढते प्रमाणही दुर्लक्ष करण्याजोगे नाही. शालेय आणि महाविद्यालयीन परिसरात केवळ तंबाखूजन्य पदार्थच नव्हे, तर चरस-गांजासह विविध अंमली पदार्थ सहज उपलब्ध असल्याच्या बातम्या अधिकच गंभीर आहेत. ही समस्या केवळ आरोग्याशी संबंधित नसून ती सामाजिक, आर्थिक आणि कायदा-सुव्यवस्थेचीही आहे.

एकंदरित व्यसनप्रतिबंधक उपाययोजना माध्यमिक नव्हे, तर प्राथमिक शाळेपासूनच सुरू करण्याची तातडीची गरज आहे. केवळ जनजागृती पुरेशी ठरणार नाही. पालकांचे सजग पालनपोषण, शाळांमधील समुपदेशन व्यवस्था, समाजाची सामूहिक जबाबदारी आणि प्रशासनाची कठोर अंमलबजावणी या सगळ्यांच्या एकत्रित प्रयत्नांशिवाय ही समस्या आटोक्यात येणे अशक्य आहे. अन्यथा, देशाची भावी पिढी व्यसनांच्या गर्तेत अडकलेली पाहण्याशिवाय पर्याय उरणार नाही.

# बौद्धिक संपदा नोंदणी हे राष्ट्रहिताचे व सन्मानाचे - ॲड. धिरज अलगदेवे

## ने.हि. महाविद्यालयात एकदिवसीय कार्यशाळा




ब्रह्मपुरी/का.प्र.

आज बौद्धिक संपदेच्या बाबतीत आपण ३२ क्रमांकावरुन ०६ क्रमांकावर पोहोचलो आहोत. बौद्धिक संपदेचे अधिकार मिळविणे व त्याविषयी मुलांमध्ये जागृती निर्माण करणे काळाची गरज आहे. बौद्धिक संपदा नोंदणी केल्यानंतर तुमचा तर सन्मान होतोच पण ते राष्ट्रहितासाठी अतिशय महत्वाचे असते ' असे महत्वपूर्ण विवेचन ॲड. धिरजकुमार अलगदेवे यांनी केले.

ने.हि. नोगाजाबाई हितकारिणी महाविद्यालयात 'आय क्यू ए सी'अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळेत 'बौद्धिक संपदा अधिकार' विषयावर प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ सुभाष शेकोकर, डॉ किशोर नाकतोडे, डॉ रेखा मेश्राम, डॉ युवराज मेश्राम, डॉ अरविंद मुंगोले इत्यादी मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन ॲड. अलगदेवेंचा सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ.शेकोकर म्हणाले की, आपण सकाळपासून संध्याकाळपर्यंत ज्या वस्तू वापरतो त्या आधिकारनिर्मित असतात. महाविद्यालयीन स्तरावरुन प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी असे काहीतरी नविन संशोधन करुन हा बौद्धिक संपदेचा अधिकार प्राप्त करुन घ्यावा, असे विचार मांडले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ युवराज मेश्राम यांनी प्रास्ताविक केले. संचालन डॉ किशोर नाकतोडे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ अरविंद मुंगोले यांनी केले. कार्यशाळेला समस्त प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# ९५ कोटींच्या कामाकडे कंत्राटदार कंपन्यांचे दुर्लक्ष

नागभीड/प्रतिनिधी

येथील एमआयडीसी, नागभीड शहर ते भिकेश्वर या राष्ट्रीय महामार्गासाठी ऑक्टोबर २०२४ पासून आतापर्यंत अनेकवेळा निविदा मागविल्या आहेत. मात्र, प्रत्येकवेळी कंत्राटदार कंपन्यांनी या निविदेकडे पाठ फिरवली आहे. संबंधित विभागाने पुन्हा एकदा या कामासंदर्भात निविदा मागविली असून, तिची मुदत ०९ जानेवारी २०२६ आहे.

या महामार्गाची किंमत ९५ कोटी ४१ लाख ८५ हजार ६४३ रुपये आहे. नागभीड शहराच्या सौंदर्यात भर घालणाऱ्या या रस्त्याबाबत असे का व्हावे, याचे कोडे अद्यापही उलगडले नाही. उमरेड-आरमोरी राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३५३ डी हा दोन पदरी राष्ट्रीय महामार्ग आधीच मंजूर आहे. पहिल्या टप्प्यात आरमोरी ते नागभीड हा मार्ग पूर्ण करण्यात आला. याला सात ते आठ वर्षांचा काळ लोटत असला तरी नागभीड ते उमरेड हा महामार्गाचे काम मात्र अद्यापही हाती घेण्यात आले नाही.

रहदारीची वास्तविकता लक्षात घेता या मार्गाचे काम पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी केली जात आहे; पण घोडे कुठे अडले, हे अद्यापही कुणाला कळले नाही. दरवर्षीच या कामास खो देण्यात येत आहे. परिणामी, नागभीड ते कानपा या मार्गादरम्यान वर्षभर अपघातांची मालिका सुरूच आहे. याच मार्गावरील नागभीड एमआयडीसी ते भिकेश्वर या सहा किलोमीटर चारपदरी मार्गाला मंजुरी मिळाली.

# ब्रम्हपुरीत सुगंधित तंबाखू विक्री, गुन्हा दाखल

ब्रह्मपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रतिबंधित सुगंधित तंबाखू साठवून त्याची विक्री करत असल्याप्रकरणी पोलिसांनी शनिवार, दि. १३ डिसेंबरला कारवाई करून मोठा साठा जप्त केला. या प्रकरणी दौलत कोटूजी वैद्य (वय ६०, रा. गांधी चौक, कुर्झा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी आरोपीकडून २१ हजार २५० रुपये किमतीचा प्रतिबंधित सुगंधित तंबाखूचा साठा जप्त केला आहे. याप्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम १२३ व २७५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapuri samachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या

## विनोदिनी

बायको : काय हो, पीठ कुठून दळून आणलं तुम्ही..?
नवरा : आपल्या नेहमीच्याच गिरणीतून...
बायको : गिरणीत गहू देऊन फिरायला गेले असणार...?
नवरा : कुठेचं गेलो नव्हतो. तिथेच तर उभा होतो....
बायको : लक्ष कुठे होतं तुमचं..? दुसऱ्या बायकांकडे बघत बसले असालं...?
नवरा : देवा शपथ नाही गं..! तिथेच उभा होतो आणि लक्ष दळणावरचं होतं.
बायको : खोटं तर अजिबात बोलू नका. व्हॉट्सॲप नाहीतर फेसबुकवर टाईमपास करत बसले असणार ...?
आजकल बघते, तुमचं घरच्या कामात अजिबात लक्ष नसतं हल्ली...
नवरा : नाही माझ्या आई...! बोंबलतेस कशाला..? काय चुकलंय ते तरी सांग...?
बायको : मग... चपात्या कशा जळाल्या??? बोला ना आता हातखिळी कां बसली ...!!!

# भारताची राष्ट्रीय ओळख ही हिंदू संस्कृती आणि मूल्यांवर आधारित

## ब्रम्हपुरीत रा.स्व. संघातर्फे प्रमुख जन संगोष्ठी कार्यक्रम

### -सुमंतजी आमशेकर

ब्रम्हपुरी/का.प्र.

भारतात राहणाऱ्या सर्व नागरिकांचे समान भूमी, समान पूर्वज, समान श्रद्धास्थान आणि समान आदर्श असल्याकारणाने हिंदू संस्कृती हिच जीवनपद्धती आहे. भारताची राष्ट्रीय ओळख ही हिंदू संस्कृती आणि मूल्यांवर आधारित आहे. असे प्रतिपादन पश्चिम क्षेत्र प्रचारक सुमंतजी आमशेकर यांनी केले. संघ शताब्दी वर्षानिमित्त समाजातील प्रमुख व्यक्तिंशी संवाद साधावा या उद्देशाने प्रमुख जन संगोष्ठी या कार्यक्रमाचे आयोजन ब्रह्मपुरी




येथिल विठ्ठल रुक्मिणी सभागृहात रविवारी करण्यात आले होते. याप्रसंगी व्यासपीठावर जिल्हा संघचालक यदुनाथजी बोरकर, प्रमुख वक्ते म्हणून रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत कार्यकारिणी सदस्य रामजी हरकरे आणि राजेशजी देउरकर, संयोजक, भारतीय विचार मंच हे उपस्थित होते.

याच कार्यक्रमात पंच परिवर्तन या विषयावर बोलताना पर्यावरण संरक्षण, कुटुंब प्रबोधन, स्वदेशी, सामाजिक समरसता आणि नागरिक कर्तव्य या पाच बिंदुंवर रामजी हरकरे यांनी प्रकाश टाकला. जबाबदार नागरिक म्हणून कर्तव्ये पार पाडून आणि समाजोपयोगी असलेली जबाबदारी समजून घेउन, ऊर्जा बचत आणि निसर्गाची सूत्रबद्धता साधणे, स्वतःच्या संस्कृती आणि मूल्यांची जाणीव ठेवणे हे विषय सम्पूर्ण समाजाच्या आचरणात यावे या करिता प्रयत्न केला तरच भारत बलशाली राष्ट्र बनेल असे मत व्यक्त केले. दोन्ही वक्त्यांच्या सत्रानंतर श्रोत्यांच्या प्रश्नांची समर्पक उत्तरे वक्तयांमार्फत देण्यात आली. दीपप्रज्वलन व वंदे मातरम् गायनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

कार्यक्रमाचे संचालन कॅप्टन प्रा अभिजीत परकरवार यांनी तसेच प्रास्ताविक आणि परिचय राजेशजी देउरकर यांनी केले. कार्यक्रमाला प्राध्यापक, शिक्षक, व्यापारी, प्रशासकीय अधिकारी, कला, उद्योजक, संत, पत्रकार, डॉक्टर, वकील, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी उपस्थित होते. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. या प्रसंगी पंच परिवर्तन आणि संविधान या विषयावर चित्र प्रदर्शनी लावण्यात आली होती.

# बल्लारपूर माल येथे मंडईनिमित्य 'जिवलगा घायाळ मी' नाटकाचे यशस्वी आयोजन

## माजी जि.प. सदस्य प्रमोद चिमूरकर यांच्या अध्यक्षतेत उद्घाटन

ब्रम्हपुरी/का.प्र.

तालुक्यातील बल्लारपुर (माल) येथे जय बजरंगबली युवा नाट्य कला मंडळ यांच्या वतीने



मंडईनिमित्त कलादर्पण रंगभूमी वडसा प्रस्तुत 'जिवलगा घायाळ मी' या तीन अंकी नाटकाचे आयोजन करण्यात आले होते. या नाटकाचे दिपप्रज्वलन विनोद झोडगे, विजयजी आदे वनरक्षक बल्लारपूर, उर्मिलाताई दिवटे सरपंच बल्लारपूर, अमोलजी मोरांडे पो.पा.बल्लारपुर यांचे हस्ते तर या कार्यक्रमाचे उद्घाटन गुरुदेवजी वाघरे यांच्या हस्ते पार पडले.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर उपस्थित होते. कार्यक्रमाला सहउद्घाटक हरीदासजी चुदरी धान्य व्यापारी मुडझा, ज्ञानेश्वरजी दिवटे ता.अध्यक्ष भा.प.ब्रम्हपुरी, अविनाशजी मस्के इंजि.भुज, अमोलजी सुकारे इंजि.ब्रम्हपुरी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उपाध्यक्ष पदी तनय देशकर ब्रम्हपुरी, निलकंठजी मानापुरे मा.पं.स.ब्रम्हपुरी, रोषणजी नवघडे वांद्रा होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रफुलजी ठिकरे भुज, ज्ञानेश्वरजी झरकर संचालक कृ.उ.बा.स.ब्रम्हपुरी, दिपकजी ठाकरे उपसरपंच बोडधा, सचिनजी बदन बोडधा, रुपेश बानबले आवळगाव, होमाजी नैताम सरपंच मुडझा, अनिलजी दिवटे तं.मु.स.अ., यशवंतजी राऊत हळदा, लोनारे सर आफिसर, शेखरजी चंद्रगीलवार, शुभमजी कोमटी, हुलके सर, धनराज पाटिल, रमेशजी उरकुडे, अरविंदजी मोरांड ,यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या नाटकाच्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमोद चिमूरकर म्हणाले की, मंडई ही आपल्या प्राचीन संस्कृतीची ओळख आहे. मंडई हे ग्रामीण भागातील लोककलेचे प्रतिक आहे. ग्रामीण भागामध्ये मंडईचे मोठ्या आवडीने आयोजन केले जाते. मंडईच्या माध्यमातुन लोककला जोपासली जात आहे. अशा कार्यक्रमांचे आयोजन केल्याने मनोरंजनासोबतच परस्पर सौहार्दही वाढतो. संस्कृती, परंपरा जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहात. हे खरच अभिमानास्पद बाब आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# आध्यात्मिक कार्यक्रमात नागरिकांनी एकत्र येणे गरजेचे - प्रेमलाल धोटे

## बेटाळा येथे भागवत सप्ताह समारोप



ब्रह्मपुरी/का.प्र.

गाव पातळीवर 'सर्वधर्म समभावाची' विचारसरणी ठेवून एकत्रित येऊन सहभाग घेतला तर असे धार्मिक कार्यक्रम निश्चितच सर्वांच्या सहकार्यातुन आणि पुढाकारातून यशस्वीपणे पार पाडण्यास मदत होईल. असे मौलीक विचार सिव्हील कॉन्ट्रॅक्टर प्रेमलाल धोटे यांनी मांडले.

शनिवार, दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी मौजा बेटाळा येथे आयोजित भागवत सप्ताह समारोपीय कार्यक्रमा प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. सात दिवस चाललेल्या भागवत सप्ताह कथेचे वाचन ह भ प दुनेदार महाराज राहणार तुळशी यांच्या अमृततुल्य वाणीतून झाले. समारोपीय कार्यक्रमाला याप्रसंगी व्यासपीठावर माजी जिल्हा परिषद सदस्य उमाजी कुथे, काँग्रेस कार्यकर्ते तथा पिंपळगाव येथील माजी सरपंच सुनील धांडे, उदापूरचे सरपंच सोनू नाकतोडे, बेटाळा गावचे सरपंच दौलत ढोंगे, मोरेश्वर दर्वे, सुखदेव प्रधान गुरुजी, ठाकरे ग्रामसेवक, विनोद दोनाडकर, बाजार समितीचे संचालक ब्रह्मदास दिघोरे, बोढेगाव येथील सरपंच मोरेश्वर नन्नावरे, सेवानिवृत्त शिक्षक तुळशीदास राऊत, ढोंगे सर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन संजय मिसार यांनी केले. गोपालकाला आरती व नंतर महाप्रसादाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

ब्रम्हपुरी समाचारच्या अंकाकरीता
www.bramhapurisamachar.com/bs
या ऑनलाईन साईटला भेट द्या
बातम्यांकरीता संपर्क :
मो. 9503100964
मो. 8275715315
: कार्यालय पत्ता :
गाडगे बाबा स्मारकासमोर, विद्यानगर, ब्रम्हपुरी

# नागपूरचे हिवाळी अधिवेशन आम. मुनगंटीवार, आम. वडेट्टीवारांनी गाजवले

## विविध प्रश्नांची सरबत्ती, विषय मांडण्याच्या अनोख्या शैलीची चर्चा

ब्रम्हपुरी/का.प्र.

नागपूर हिवाळी अधिवेशनाने चंद्रपूर जिल्ह्याला काय मिळाले यापेक्षा या जिल्ह्याचे सुपुत्र माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार व काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार या सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या दोन आमदारांनी हिवाळी अधिवेशन खऱ्या अर्थाने गाजवले. शेतकरी कर्जमाफी, ओबीसींचे प्रश्न, वाळू तस्करी, शिक्षणाचा खेळखंडोबा, मानव-वन्यजीव संघर्ष अशा विविध प्रश्नांची सरबत्ती करून सरकारला सळो की पळो करून सोडले. त्यामुळे या दोन आमदारांच्या विधानसभेतील प्रश्नोत्तरांची, विषय मांडण्याच्या अनोख्या शैलीची सर्वत्र चर्चा होत आहे.





हिवाळी अधिवेशन ८ डिसेंबरला सुरू झाले आणि रविवार १४ डिसेंबरला अधिवेशनाचे सूप वाजले. या अधिवेशनाने विदर्भाला काय मिळाले किंवा चंद्रपूर जिल्ह्याच्या पदरी काय पडले याची चर्चा सुरू झाली आहे. मात्र, या चर्चेपेक्षाही सत्ताधारी भाजपचे माजी मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार व काँग्रेस विधिमंडळ नेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्या विधानसभेतील कामकाजाची, प्रश्नोत्तरांची सर्वत्र चर्चा सुरू झाली आहे. समाज माध्यमांवर तर मुनगंटीवार व वडेट्टीवार यांच्या भाषणांच्या रिल्स चांगल्याच सार्वत्रिक झाल्या आहेत. जिल्ह्यात सुधीर मुनगंटीवार, विजय वडेट्टीवार, कीर्तीकुमार भांगडिया, किशोर जोरगेवार, देवराव भोंगळे व करण देवतळे असे विधानसभेचे सहा आणि विधान परिषदेचे सुधाकर अडबाले, ॲड. अभिजित वंजारी हे दोन असे एकूण आठ आमदार आहे. मात्र, या आठ आमदारांपैकी केवळ मुनगंटीवार व वडेट्टीवार या दोन आमदारांनीच विधानसभा अधिवेशन चांगले गाजवले आणि सरकारचे जिथे चुकले तिथे धारेवर धरले. या दोन्ही आमदारांनी जिल्ह्यातील प्रदूषणाच्या प्रश्नापासून शिक्षकांचे विविध प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, वाळू तस्करी यासोबतच मानव-वन्यजीव व-वन्यजीव संघर्षात दरवर्षी असंख्य नागरिकांचा बळी जात असल्याचा विषय अतिशय पोटतिडकीने मांडला. पोंभूर्णा व कापूस करंजी एमआयडीसी, उत्पादक शेतकऱ्यांचा प्रश्न, घरकुलासाठी निधी, मोरवा विमानतळासाठी निधी असे असंख्य विषय मुनगंटीवार यांनी लावून धरले. विक्रमी ३७ लक्षवेधी विधानसभेत मांडताना सरकारचे तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांचे नेमके कुठे चुकत आहे यावर बोट ठेवले.

या दोन आमदारांच्या पाठोपाठ आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर वीज केंद्रात नवीन संच स्थापना, लोकांचा विरोध असेल तिथे दारू दुकानांना परवानगी देऊ नये या दोन विषयांसोबतच झोपडपट्टी-वासीयांना कायमस्वरूपी पट्टे हा विषय मांडला. राजुराचे आमदार देवराव भोंगळे यांनी गोंडपिंपरी तालुक्यातील विविध प्रश्नांसोबतच सीमावर्ती भागातील गावांचे प्रश्न तेथील समस्या मांडल्या. आमदार अडबाले यांनी शिक्षकांचे, आयटीआयचे प्रश्न मांडले.

# ब्रम्हपुरीत नायलॉन मांजा जप्त

## पोलीस कारवाईत १२ हजारांचा मुद्देमाल जप्त




ब्रह्मपुरी/का.प्र.

शहरातील बालाजी वॉर्ड परिसरात प्रतिबंधित नायलॉन मांजा बाळगून विक्री करत असल्याप्रकरणी ब्रह्मपुरी पोलिस ठाण्याच्या पथकाने कारवाई केली आहे. या कारवाईत श्रीकांत पद्माकर दलाल (५७) रा. बालाजी वॉर्ड, ब्रम्हपुरी याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीकडून मोनो काईट फायटर नायलॉन मांजाच्या ९ चक्री व मोनोफिल गोल्ड लालन मांजाच्या ४ चक्री असा एकूण १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले यांच्यासह सहा. पोलीस निरीक्षक मनोज खडसे, पोहवा मुकेश गजबे, पोअ निलेश तुमसरे, इर्शाद खान, स्वप्निल पळसपगार, वशिष्ठ रंगारी, प्रवीण भिवगडे यांनी केली.

अर्धसाप्ताहिक ब्रम्हपुरी समाचार वाचा या लिंक वर...
www.bramhapurisamachar.com/bs

# पद्मापूर-भूज परिसरात वाघाची दहशत

## नरभक्षी वाघाचा त्वरीत बंदोबस्त करण्याची विनोद झोडगे यांची मागणी



ब्रम्हपुरी/का.प्र.

ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक गावात वन्य प्राण्याचे (वाघ/बिबट) येण्याचे प्रमाण वाढल्याने भविष्यात होणारी जिवीतहानी टाळण्याकरीता त्वरीत उपाययोजना करून नरभक्षक वाघाचा बंदोबस्त करावा अशी मागणी घेऊन कॉं.विनोद झोडगे जिल्हा सहसचिव कम्युनिस्ट पक्ष यांनी प्रत्यक्ष पद्मापुर व भूज या गावांना भेट देऊन गावकरी व वनविभागाचे अधिकारी, कर्मचारी यांच्याशी चर्चा करून नरभक्षक वाघाचा बंदोबस्त करण्याची मागणी केली.

ब्रम्हपुरी तालुक्यातील अनेक गावात वन्य प्राण्यांचे (वाघ / बिबट/रानटी डुक्कर/अस्वल) येण्याचे प्रमाण वाढल्याने तसेच या वर्षभरात अनेक ठिकाणी नरभक्षक वाघांच्या हल्ल्यात कितीतरी लोकांना आपला जीव गमवावा लागला. तर काहींना पशुधन सुध्दा गमवावे लागले. त्यामूळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. आपल्या जंगलाला लागून शेतकऱ्यांची शेतजमीन असून सध्या धान मळणीचा कालावधी असल्याने शेतकरी व मजूरांना जीव धोक्यात टाकून कामे करावी लागतात.

नियमित वाचा
अर्धसाप्ताहिक
ब्रम्हपुरी समाचार

नुकताच पद्मापूर या गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज चौक परीसरात गेल्या ६-७ दिवसासापासुन वन्य प्राणी (बिबट) गावात येण्याचे प्रमान वाढलेले आहे. या ३-४ दिवसात पद्मापूर व भूज गावात अनेक जनावरे लहान वासरे, म्हशी, बकरी वन्य प्राण्यानी (बिबट) घरात घुसुन फस्त केलेली आहेत. आता तर त्याचे रोज रात्री गावात दर्शन होत आहे. मात्र वनविभागाचे अधिकारी या बाबीकडे दुर्लक्ष करीत आहेत.

आपले प्रशासन जिवीतहानी झाल्यावरच जागे होईल काय? या परीसरातील जनता भयभित झालेली असल्याने सायंकाळी घराबाहेर निघने शक्य होत नाही. अशातच प्रत्येकाचे घरी लहान मुले आहेत. ते स्वत:चे घरी अंगणात खेळतात हिच संधी साधुन वन्य प्राण्यानी (बिबट) त्यांना भक्ष केल्यास त्याला जबाबदार कोण? या कोवळ्या बालकांचा जिव गेल्यानंतरच कार्यवाही करणार काय?

करीता आपल्या स्तरावरून भविष्यात होणारी जिवीतहानी टाळण्याकरीता त्वरीत उपाययोजना करावी. अन्यथा कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा विनोद झोडगे यांनी दिला आहे. यावेळी क्षेत्र सहाय्यक सचिन लोणारे, वनरक्षक विजय आदे व भूज, पद्मापूर गावातील नागरिक उपस्थित होते.

✽✽✽✽✽✽✽

# विविध सामाजिक उपक्रमांनी आम. वडेट्टीवार यांचा वाढदिवस साजरा

ब्रम्हपुरी/का.प्र.

जनसेवा हीच ईश्वरसेवा आहे असे मानून जनसेवेचा व्रत अंगिकारलेले विधीमंडळ काँग्रेस पक्षनेते, आमदार विजय वडेट्टीवार यांचा वाढदिवस ब्रम्हपूरी तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने ब्रम्हपूरी शहरातील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांना फळ वितरण करण्यात



आले. सोबतच शहरातील निराश्रित व आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या नागरिकांना ब्लँकेटचे देखील वितरण करण्यात आले.

आमदार विजय वडेट्टीवार यांनी ब्रम्हपूरी मतदारसंघाच्या लोकप्रतीनीधीत्वाची सूत्रे सांभाळली तेव्हा पासूनच सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवून सामान्य, गरीब, वंचित माणसाची सेवा करण्यासाठी त्यांनी आपला हात नेहमीच पुढे ठेवला आहे. त्यामुळे त्यांचा जन्मदिवस देखील सामाजिक उपक्रम राबवून साजरा करण्याचा निर्णय ब्रम्हपूरी तालुका व शहर काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी घेतला आहे.

याप्रसंगी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते डॉ देविदास जगनाडे, तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खेमराज तिडके, शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हितेंद्र राऊत, काँग्रेस प्रदेश सचिव डॉ थानेश्वर कायरकर, शहर काँग्रेस उपाध्यक्ष योगेश मिसार, वैद्यकीय अधीक्षक डॉ खंडाळे, वैद्यकीय अधिकारी श्रीकांत कामडी, महीला काँग्रेसच्या शहराध्यक्ष योगिता आमले, कृउबा उपसभापती सुनिता तिडके, शहर काँग्रेस कार्याध्यक्ष सुधाकर पोपटे, जिल्हा काँग्रेस सचिव वासुभाऊ सोंदरकर, ओबीसी सेलचे उमेश धोटे, शहर काँग्रेस सचिव वकार खान, अनुसूचित जाती सेलचे शहराध्यक्ष मुन्ना रामटेके, शहर काँग्रेस सचिव पुष्पाकर बांगरे, ब्रम्हपूरी बिगरशेती संस्था अध्यक्ष अनिल दोनाडकर, जिल्हा काँग्रेस सहसचिव गाजी पटेल, माजी नगरसेवक संजय ठाकुर, माजी नगरसेवक मनोज कावळे, ओबीसी सेलचे शहराध्यक्ष राकेश पडोळे, युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष रवी पारधी, इक्बाल जेसानी, जयश्री कुथे, अनुसूचित जाती सेल जिल्हा सहसचिव प्रा.डि.के.मेश्राम, युवक काँग्रेस उपाध्यक्ष प्रकाश खोब्रागडे, तालुका काँग्रेस सहसचिव अमित कन्नाके, शहर काँग्रेस सहसचिव सोमेश्वर उपासे, माजी नगरसेवक सागर आमले, शहर काँग्रेस उपाध्यक्ष सुनिल विखार, राजेश तलमले, गिरीश बुराडे, सारंग बनपुरकर, सुधीर शिवरकर, रिंकूभाऊ पठाण, वसंत ज्ञानवडकर, मुर्लीधर शिवुरकार, प्रशांत करपे, आशिष देशमुख, प्रणय सोंदरकर, कार्यालय प्रमुख सुधीर पंदीलवार, झलके सर, वैष्णवी आमले यांसह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ब्रम्हपुरीच्या कुर्झा वार्डात विविध कार्यक्रमांनी संताजी महाराज जयंती साजरी

ब्रह्मपुरी/का.प्र.

संतश्रेष्ठ संताजी जगनाडे महाराज जयंती उत्सवानिमित्त ब्रह्मपुरीतील कुर्झा वार्डात विविध



कार्यक्रम आयोजित करुन संताजी महाराजांची जयती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सर्वप्रथम संताजी चौकात मान्यवरांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर महिला मंडळाच्या वतीने वारकरी भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. भजन गजर झाल्यानंतर वार्डातून मिरवणूक काढण्यात आली. यात महाराजांची वेशभूषा, विठ्ठल- रुक्मिणी दर्शन इत्यादी प्रकारांनी भव्य मिरवणूक काढली गेली. त्यानंतर गोपाळकाला आणि सामूहिक स्नेहभोजनाचा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमासाठी शालूबाई साखरकर, गोलू साखरकर, रमेश जिभकाटे, सुरेश जिभकाटे, खुशाल विखार, मोतीलाल मुंडले, दिनेश मुंडले, डुबराज लाखे, दिनकर खेत्रे, सुनिल उराडे, सुनिल बावनकुळे, दिनकर फटिंग, सतिश बावनकुळे, यशवंत विखार, नाना सेलोकर, राधेश्याम सेलोकर यांनी मोलाचे सहकार्य करुन कार्यक्रम यशस्वी केला.

## न.प. क्षेत्रातील खड्ड्यांमुळे अपघात झाल्यास मिळेल भरपाई

ब्रम्हपुरी/का.प्र.

रस्त्यांवरील खड्ड्यांबाबत तक्रारींसाठी ब्रह्मपुरी नगरपालिकेने एक समिती स्थापन केली आहे. ही समिती नगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांबाबत कारवाई करेल असे मुख्याधिकाऱ्यांनी सांगितले. मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्रमांक ७१/२०१३ (अंतरिम अर्ज क्रमांक २९११९/२०२५ (हस्तक्षेपासाठी) मध्ये एक आदेश दिला. याचिकेत दिलेल्या निर्देशांनुसार ही समिती स्थापन करण्यात आली आहे. ब्रह्मपुरी नगरपालिका क्षेत्रातील रस्त्यांवरील खड्डे आणि उघड्या मॅनहोलमुळे अपघात झालेल्या पीडितांच्या किंवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या भरपाईच्या गरजा पूर्ण करण्यासाठी ही समिती काम करेल.

खड्डयांमुळे झालेल्या दुखापतींसाठी नुकसान भरपाई या लाभाचा लाभ घेण्यासाठी तक्रारी दाखल करण्यास सांगण्यात आले आहे. शहर परिसरात मॅनहोल किंवा खड्डयांमुळे जखमी झालेल्या कोणालाही भरपाई मिळेल. अपघातासाठी महानगरपालिकेला जबाबदार धरून ही कारवाई केली जाईल. यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये नगरपालिकेचे मुख्य अधिकारी, चंद्रपूरच्या कायदेशीर सेवा प्राधिकरणाचे सचिव, नगरपालिकेचे शहर अभियंता, नगररचना सहाय्यक, पाणीपुरवठा आणि सांडपाणी अभियंता, नगरपालिकेचे उपविभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम बांधकामांचे उपविभागीय अभियंता आणि नगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी इत्यादींचा समावेश असेल. पीडितांना याची दखल घेण्याचे आणि जर त्यांच्याकडे अशी कोणतीही तक्रार असेल तर ती नगरपालिकेतील संबंधित अधिकाऱ्याकडे नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

❁❁❁❁❁❁


**... QUOTES ...**

"If you salute your duty, you no need to salute anybody. But if you pollute your duty, you have to salute everybody."

- Dr. APJ Abdul Kalam


**चारोळी**

*झोपण्यासाठी गोळ्यांची गरज*
*उठण्यासाठी गजराची गरज...*
*शांती-विश्रांती पराधीन तर,*
*अशा जगण्याची काय गरज...*

★ रचनाकार : डॉ. राजन जयस्वाल ★

## गोसेखुर्दच्या पाण्यासाठी महिलांचे आमरण उपोषण

ब्रह्मपुरी/का.प्र.

गोसेखुर्द प्रकल्पाच्या उजव्या कालव्याचे पाणी उन्हाळी हंगामात धान पिकाला नियमित मिळावे, या मागणीसाठी सायगाटा येथील गोसेखुर्द उजवा कालवा विभाग कार्यालयासमोर महिला शेतकऱ्यांनी १५ डिसेंबर २०२५ पासून आमरण उपोषण आंदोलन सुरू केले आहे. या उपोषणस्थळी आज दिनांक १६ डिसेंबर रोजी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर यांनी भेट देत उपोषणकर्त्यांशी सविस्तर संवाद साधला.

गेल्या दोन वर्षांपासून उन्हाळी धान पिकाला पाणी मिळावे यासाठी शेतकरी सातत्याने निवेदनांद्वारे पाठपुरावा करत आहेत. मात्र संबंधित विभागाकडून ठोस निर्णय न घेता केवळ बनवाबनवीची उत्तरे दिली जात असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. अस्मानी-सुलतानी संकटांनी त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांसमोर आता आमरण उपोषणाशिवाय पर्याय उरला नसल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे. उपोषणस्थळी उपस्थित महिलांशी सुमारे दोन तास चर्चा करत प्रमोद चिमूरकर यांनी त्यांच्या समस्या जाणून

(उर्वरित पान क्र. ६ वर)

# एल.एम.बी. पब्लिक स्कुल, ब्रम्हपुरी येथे वादविवाद स्पर्धा उत्साहात संपन्न







ब्रम्हपुरी का/प्र.

येथील एल. एम. बी. पब्लिक स्कुलमध्ये वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये शाळेचे मुख्याध्यापक नादिर कुरेशी सार, उपमुख्याध्यापिका रश्मी राठी मॅडम व परिक्षक म्हणून प्रतिभा दोनाडकर मॅडम उपस्थित होत्या. वादविवाद स्पर्धेमध्ये वर्ग ८ वी मधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

वादविवाद स्पर्धेमध्ये खालील विषयांचा समावेश होता. त्यामध्ये १. Should students be allowed to use AI tools to help with homework and assignments? २. Should students be taught cyber safety and cyber laws at school? ३. Is AI safe or can it become dangerous if not controlled? ४. Is AI and automation making our lives better or worse? ५. Are video games helpful for learning or do they cause distraction? ६. Should students under 13 be allowed to use social media?

सर्वप्रथम विद्यार्थ्यांना कार्यक्रमामध्ये वादविवाद स्पर्धा कशा होतात? त्याचे नियम आणि कशाप्रकारे अशा स्पर्धाना तोंड द्यावे याचे मार्गदर्शन करण्यात आले. अशा स्पर्धेत विषय निवडतांना जो वादग्रस्त विषय असतो. त्याला दोन बाजू असतात. यातील एक बाजू दिलेल्या वेळेत तूमचे म्हणने ठासून मांडायचे असते. तुम्ही तुमची बाजू किती छान पटवून देता तुमचे ज्ञान, मुद्दे उदाहरणे यांचा वापर करून वादातील तुमचे कौशल्य कसे दाखवतात. प्रतिपक्षाचे मुद्दे कसे खोडून काढतात यावर विजेता ठरतो. भरपूर पुस्तके वाचन केल्या जातात. सर्वसामाजिक प्रश्न आर्थिक प्रश्नांची चांगली जाण होतें. मुद्दे मांडून त्यांचा विस्तार करून त्यातील समर्पक उदाहरणे दिली जाते. तज्ञ मंडळीला आपले विचार ऐकवून आणि त्यांचे परखड परिक्षण करायला सांगून त्यातून ज्ञान व कौशल्य विकसीत करून स्वतःमध्ये आश्मविश्वास निर्माण व्हावा याकरिता वादविवाद स्पर्धा घेण्यात आली.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एल. एम. बी पब्लिक स्कूल नेहमी अशा स्पर्धाचे आयोजन करीत असते. वादविवाद स्पर्धा यशस्वी करण्याकरीता स्कुलच्या शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.



Miracle constructions & Developers
श्रीराम नगरी - डेव्हलपर्स
NATP प्लॉट्स उपलब्ध
सिंदेवाही
नवरगांव
तळोधी
चंद्रपुर (चौराळा)
संपर्क : अनिल दोनाडकर
मो. 8806776699, 9834946501
डुप्लेक्स बांधकाम करून मिळेल.

प्रो.प्रा. सुरेश सोरते
मो. 8698323337
सोरते स्टेनलेस स्टील वर्क्स
गीत (बुरले) पेट्रोल पंपसमोर
नागभीड रोड, ब्रम्हपुरी
रेलींग, ग्रिल व गेट
स्टिलचे नावे बनवून मिळेल.




## सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी...

(पान क्र. १ वरून)

घेतलं जात असल्याने शेतकऱ्याने एक लाख घेतलेलं कर्ज तब्बल ७४ लाखांवर गेलं.

शेवटी कर्ज घेतलेल्या एका सावकाराने किडनी विकण्याचा सल्ला दिला. एका एजंटने रोशन कुडे यांना कोलकत्ता येथे नेलं. कुडे यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तपासणीनंतर कंबोडिया येथे त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली आणि किडनी काढण्यात आली. ही किडनी कुडे यांनी आठ लाखाला विकली.

सदर प्रकरणाची दखल जिल्हा पोलीस अधिक्षक मुक्कमा सुदर्शन यांनी घेतली असून आरोपी अवैध सावकारांची कसून चौकशी सुरू आहे. सदर गुन्हयासंदर्भात ६ सावकारांवर कारवाई करण्यात आली आहे. यापैकी पाच जणांना अटक करण्यात आली असून एकाच्या शोधात पोलीस आहेत. या प्रकरणी अवैध सावकारी करणाऱ्या आरोपी विरोधात भांदवि कलम १२० ब, ३२६, ३४२, २९४, ३८७, ५०६, ३४ व महाराष्ट्र सावकारी अधिनियम ३९, ४४ कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास ब्रम्हपुरी पोलीस करीत आहेत.

### उपस्थित झालेले प्रश्न...

- पिडीत शेतकऱ्याने किडनी विकण्याचा निर्णय कोणाच्या सांगण्यावरून घेतला?
- किडनी विकायचीच होती तर ती भारतात कां विकली नाही?
- किडनी विकण्यासाठी कंबोडिया हा देशच कां निवडला?
- मानवी अवयवांची तस्करी करणारे आंतरराष्ट्रीय रॅकेट सक्रीय तर नाही ना?
- कंबोडिया येथे जाण्यासाठी पारपत्र केव्हा बनविले व्हिसा केव्हा मिळाला?
- कंबोडिया येथे जाण्यासाठी कोणत्या मध्यस्थाची मदत घेतली?

## गोसेखुर्दच्या पाण्यासाठी महिलांचे...

(पान क्र. ५ वरून)

घेतल्या. यावेळी त्यांनी गोसेखुर्द प्रकल्पाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी मोबाईलवरून थेट संपर्क साधत शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी केली. तसेच उपोषणकर्त्यांमध्ये अनेक महिला शेतकरी असल्याने त्यांच्या आरोग्याची योग्य ती काळजी घेण्याचे स्पष्ट निर्देशही दिले. यासोबतच ब्रह्मपुरी ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांशी संपर्क साधून उपोषणकर्त्यांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या. अनुचित प्रकार घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी गोसेखुर्द प्रकल्पाच्या अधिकाऱ्यांवर राहील, असे स्पष्ट मत माजी जिल्हा परिषद सदस्य प्रमोद चिमूरकर यांनी व्यक्त केले.

## नगराध्यक्ष व २३ नगरसेवक...

(पान क्र. १ वरून)

दिवशी नगर परिषद कार्यालयासमोरून जाणारा ब्रम्हपुरी-वडसा मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात येणार असून नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. तसेच मतमोजणीसाठी येणारे उमेदवार, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी यांच्यासाठी नगर परिषद शेजारील पंचशील वसतिगृहाच्या मैदानात वाहनतळ (पार्किंग) व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व नागरिकांनी मतमोजणीच्या कालावधीत शांतता व शिस्त राखून कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी सतीश मासाळ यांनी केले आहे.

वाचाल तर वाचाल..



बुधवार बंद
- दुकानाची वेळ - सकाळी १० ते सायं. ६ वा.
सी.आर.आय. मोटारपंपचे विदर्भातील प्रथम अधिकृत विक्रेता
गणेश ॲग्रीकल्चरल एजन्सी
रेल्वे स्टेशन रोड, खानोरकर भवन, भगतसिंग चौक, ब्रम्हपुरी
फोन नं. (07177) 272573 मोबाईल क्र. 9423115853, 7083214053
Kirloskar
CRI
ISO : 9001 : 2015 मानांकन प्राप्त दुकान
1994 पासून आपल्या सेवेत
किर्लोस्कर, एनसंस, लुबी, मोटार पंप, उषा, होन्डा, कॉमेट इंजीन, राज पी.व्ही.सी. पाईप, स्प्रिंकलर पाईप, आटा चक्की, हॅण्डपंप, केबल वायर व स्पेअर पार्टचे विक्रेता


Printed by Rajiv Pachpor published by Ashok Kisanlalji Bhaiya on behalf of Ashok Kisanlalji Bhaiya and printed at Aqua Process, Modi No.1, Sitabuldi, Nagpur and Published at Bramhapuri Samachar Office, Wadsa Road, Bramhapuri Editor Ashok Kisanlalji Bhaiya MAHMUL/2016/69789 Mob. 9422135404